| MHLA120021622020 | नि.दि.दा.क्र.४०९/२०२०<br>जहुरबी वि. बिपाशा व इतर |
|---|---|

## नि.क्र.४१ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला उलटतपास नाही चा आदेश बाजुला करण्यासाठी (set–aside) दाखल केलेला आहे. त्यावर वादींचा लेखी खुलासा मागविण्यात आला. वादींनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले असून प्रतिवादींना पुरावा देण्यासाठी अनेक संधी दिल्या परंतु ते जाणीवपुर्वक न्यायालयात गैरहजर राहिले.

२. युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा हा मालकी हक्क घोषीत होवून कायमचा मनाई हुकूम मिळणेबाबत दाखल केलेला आहे. परंतु अनेक संधी देवून सुध्दा सदर प्रतिवादींनी वादीचा उलटतपास घेतला नाही त्यामुळे त्यांचे विरुध्द उलटतपास नाही चा आदेश पारीत केलेला आहे. परंतु असे जरी असले तरी सदर प्रतिवादींना उलटतपास घेण्याची नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन संधी देणे गरजेचे आहे. एकंदरीत सदर अर्जात नमुद केलेले कारण व कायदेशिर बाब विचारात घेता सदर प्रतिवादींना उलटतपास घेण्याची संधी देणे आवश्यक आहे. परंतु असे असले तरी प्रस्तुतचा दावा हा सन २०२० चा आहे. त्यामुळे अशा परिस्थीतीत प्रतिवादींवर खर्च लादणे न्यायोचीत होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादींचा सदर अर्ज नि.क्र.४१ वादींना रक्कम रु.५०/– (रक्कम रुपये पन्नास) खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2024.04.04 17:44:53 +0530

(आर. डी. खराटे)

दि.०४/०४/२०२४ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, निलंगा